प्रायोगिक तत्वावर नेमणूक केलेल्या उमेदवारांच्या परिविक्षा कालावधीसंबंधी.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-१०८१-२४५२-१२,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,

दिनांक:- २१ नोव्हेंबर १९८४.

## शा स न प रि प त्र क

लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील सरळसेवेने भरावयाच्या पदावर उमेदवारांची निवड करताना काही वेळा सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे आवश्यक अर्हतेच्या जवळपासची अर्हता धारण करणारे उमेदवार आयोगाकडून प्रथमत: एक वर्षाचे कालावधीसाठी प्रायोगिक तत्वावर ( ) म्हणून निवडले जातात. प्रायोगिक नियुक्तीच्या कालावधीत अशा उमेदवारांचे काम समाधानकारक असल्यास आयोगाकडून त्यांची परिवीक्षाधीन नियुक्ती होण्यासाठी शिफारस केली जाते. प्रायोगिक नियुक्तीव्दारे शासन सेवेत येऊन त्याच पदावर परिवीक्षा कालावधीवर नियुक्ती झालेल्या अधिका-यांच्या बाबतीत त्यांचा परिवीक्षा कालावधी कोणत्या दिनांकापासून समजण्यात यावा याबद्दल काही शंका व्यक्त करण्यात आल्या होत्या. त्यासंबंधी असे स्पष्टीकरण देण्यात येत आहे की,प्रायोगिक नियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी सर्वसाधारणपणे १ महिना अगोदर संबंधित अधिका-यांच्या कामाबद्दल विशेष अहवाल लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात यावा. लोकसेवा आयोगाने सदर अहवाल समाधानकारक असून अधिका-यांची नियुक्ती परिवीक्षा कालावधीवर करावी अशी शिफारस केल्यास उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती प्रायोगिक कालावधी संपल्यानंतरच्या दिनांकापासून परिविक्षाधीन उमेदवार म्हणून करण्यात यावी. प्रायोगिक नियुक्तीचा काळ परिवीक्षा कालावधीत समाविष्ट करण्यात येऊ नये. परिविक्षाधीन उमेदवारांनी परिवीक्षा काळात सेवा प्रवेश नियमांत विहित केलेली विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

उप सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई(पत्राने),
महाराष्ट्र शासनाचे सर्व सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग(प्रत्येकी ५ प्रती),